उत्तम निर्मितीमूल्यांसाठी...

सहा वर्षांपूर्वी उत्तम निर्मितीमूल्य असलेली पुस्तके पार दिल्लीमधून छापून आणण्याचा प्रकार नव्याने प्रकाशन व्यवसायात उतरलेल्या कल्याणमधील तरुणांनी केला. छपाईआधी प्रत्येक पुस्तकाच्या सगळ्या अंगाचा बारकाईनं विचार करून त्याच्या प्रकृतीनुसार ते कसं दिसेल यासाठी आग्रही असलेल्या 'पपायरस' प्रकाशनाची ही कहाणी. विशिष्ट कागद, मुखपृष्ठ यांच्या हट्टामुळे दालनात आणि घरातील ग्रंथसंग्रहात ठेवताना शेजारच्या पुस्तकापेक्षा यांचे पुस्तक उठून का दिसते, याचे उत्तर देणारी...

नव्या जाणिवेचे प्रकाशक

■ धनश्री खंडकर,
■ श्रीपाद अ. सु.

"A good publishing house to be one- if you'll allow the tautology- that publishes, so far as possible, only good books. Thus, to use a summary definition, those books of which the publisher tends to feel proud rather than ashamed." (The art of Publisher) - Roberto Calasso

दीर्घकाळ प्रकाशन व्यवसायात व्यतीत केलेल्या रॉबेर्तो कलासो यांचं हे वाक्य प्रकाशक होण्याअगोदरपासून आमच्या मनात घर करून राहिलं आहे. खरं तर आम्ही प्रकाशन व्यवसायात येण्याचं ठरवलं नव्हतं. पुस्तकांची-वाचनाची आवड होती. मुळात श्रीपादचं तो नाटकवाला असल्यामुळे त्या संदर्भात त्याचं वाचन आणि पुस्तकं जमवणं सुरू होतं. नाटक करताना पूरक वाचनाकडे आणि जागतिक सिनेमाकडे त्याला भूषण कोलतेनं वळवलं. त्यातून नीतीन रिंढे, निखिलेश चित्रे अशा पुस्तका-सिनेमांत रमणाऱ्या लोकांचा सहवास लाभला. भूषण त्याच्या मित्रांसोबत रस्त्यावर दोन-तीन दिवसांचे पुस्तकांचे प्रदर्शन आणि विक्री करायचा. ते तो कसं करतो याचं आम्हाला नवल वाटे.

२०१५ साली समविचारी मित्रांनी नवीन नाटकाची संस्था सुरू केली; तेव्हा संस्थेसाठी पैसे मिळवेत म्हणून भूषणच्या मदतीने सलग दोन-तीन वर्षं आम्ही प्रदर्शन भरवायचो. पुढे २०१६ साली श्रीपाद आणि भूषण 'नव अनुष्टुभ' साठी काम करायला लागले, त्यामुळे पुस्तकं आणि साहित्याच्या जाणिवेचा परीघ अधिक विस्तारू लागला. नीतीन रिंढे सरांसोबत काम करताना नियतकालिकाच्या निर्मितीची प्रक्रिया जवळून अनुभवायला मिळाली. केतन बंगाल मांडणी करायचा; तेव्हा चित्रावी जागा, फॉन्ट, लॉमिनेशन अशा बारीक-बारीक गोष्ट बघायला मिळायच्या. रिडेसर आणि भूषणसोबत काम करताना पुस्तक निर्मिती, प्रकाशन व्यवसाय यांबद्दलच्या चर्चामधून या विषयातलं कुतूहल आणि शिकण्याची इच्छा वाढत होती. पुस्तकांचं दुकान सुरू करायची इच्छा काही वर्षं भूषणच्या डोक्यात होती, ती त्याने २०१८ प्रत्यक्षात आणली. दुकानाला नाव काय द्यायचं यावर त्याने बराच विचार केला, शेवटी 'पपायरस' हे नाव ठरलं आणि 'पपायरस द बुक स्टोअर' सुरू झालं.

इजिप्तमधे 'सिपरस पापीरोस' या झाडाच्या चोथ्या पासून पपायरस हा कागद बनवला जाई; आणि तो हस्तलिखितासाठी आणि कुतुहलातूनच अशा प्रकारे काही वर्षांनी प्रकाशन त्याच नावानं आम्ही सुरू केलं.

जुन्या काळातली छापाई, पुस्तक बांधणी, त्याकाळी झालेले प्रयोग आणि आजही ५०-६० वर्षांनी उत्तम अवस्थेत टिकून असलेली ती पुस्तकं बघून, वाचून आम्हाला जाणवत गेलं की काळाच्या ओघात टिकून राहिलेल्या या पुस्तकांनी त्या काळचा भवताल, लेखक, त्यांचे विचार आजपर्यंत पोहोचवलेत. त्यामुळे प्रकाशन सुरू करताना निर्मिती प्रक्रियेचे हे मापदंड डोळ्यासमोर होते. अशी जुनी पुस्तकं, जागतिक स्तरावरची उत्तम निर्मिती

ग्रंथनिर्मितीसाठी वापरला जाई. हे कागदाचं आद्यरूप मानलं जातं. हजारो वर्षांनंतरही त्यावरील मजकूर टिकून राहतो. पपायरस या नावाचं श्रेय भूषणचं. त्याला समर्पक असा लोगो गणेश विसपुते यांनी बनवून दिला, यात वापरलेलं अक्षरवळण वाराव्या शतकातल्या मराठीचं आहे. पुस्तक निर्मिती, विक्री, साहित्याबद्दल विस्तारलेली जाणीव, जागतिक साहित्यातील चडामोडी, जगभरात पुस्तक निर्मितीत होणारे प्रयोग या असणारी पुस्तकं यांचा अभ्यास सुरू झाला. मग एक लक्षात आलं, कुठलीही निर्मिती करताना त्या पुस्तकाचा लेखक, मुखपृष्ठकार, मांडणीकार, ग्रंथ संकल्पनाकार आणि प्रकाशक या सगळ्यांनी एकविचाराने काम केलं की पुस्तक चांगलं होतं, नाहीतर ते एकांगी होऊ शकतं. पहिल्या पुस्तकाची सुरुवात याच विचाराने केली. आज २६ पुस्तकं प्रकाशित झाल्यावरही हे आमचं ठाम मत आहे.

हे सगळे विचार प्रत्यक्षात उतरवण्याची सुरुवात नितीन रिंढे यांच्या 'पासोडी'ने झाली. एकेदिवशी त्यांनी आम्हाला भेटायला बोलावलं आणि 'पासोडी'चं हस्तलिखित हातात ठेवलं. त्यांनी आमच्यावर इतका विश्वास दाखवला नसता तर प्रकाशन सुरू व्हायला काही काळ अजून उशीर झाला असता.

मुंबई किंवा दमट हवामानात हळूहळू कागदातलं ॲसिड उडतं, परिणामी कागद पिवळा पडतो आणि कालांतराने कागदाचे तुकडे पडतात. ते टाळण्यासाठी आणि टिकाऊपणासाठी 'शेषासई' चा नॅचरल शेडचा ॲसिडफ्री कागद आम्ही छपाईसाठी निवडला. पहिलं पुस्तक असल्याने ते पुठ्ठा बांधणी करून, त्यावर गडद निळ्या रंगाचा Geltex कापडी पोत असलेला कागद वापरून त्यावर शीर्षकांचं आणि लेखकाच्या नावाचं चंदेरी फॉइलिंग करून घेतलं. विसपुते यांनी मुखपृष्ठासाठी चित्र केलं आणि त्याला साजेसा पोत असलेला कागद आम्ही निवडला. मग पुस्तकाला साजेसा बुकमार्क केला. पहिलं पुस्तक तयार झालं. आम्ही या पुस्तकाचे खूप लाड केले, तरी अनेक बारीकसारीक गोष्टी राहिल्या. पण पुढच्या प्रत्येक पुस्तकात नवं शिकत, नवे प्रयोग करत राहिलो.

आम्च्या बहुतेक पुस्तकांसाठी 'शेषासई'चा तोच ७०-१०० जीएसएमचा कागद वापरण्यात आलाय. पुस्तक बांधणी करताना सेक्शन शिलाई करतो, त्यामुळे पुस्तकाची मजबूती टिकून राहते. विषयानुरूप चित्रकाराची निवड करून, चित्रं बनवून घेतली जातात. त्या चित्रानुसार मुखपृष्ठासाठीचा कागद निवडला जातो. जसं आमच्या 'पिवळा पिवळा पाचोळा'च्या मुखपृष्ठाच्या कागदाचा पोत कॅनवाससारखा आहे. 'असहमतीचे आवाज' च्या मुखपृष्ठावरील चित्र हे ज्यूट वर चितारलेले होते. त्याची परिणामकता साधण्यासाठी Geltex वर मुखपृष्ठ छापून घेतलं. तसंच नंतर पूर्ण रंगीत पुस्तक करताना नॅचरल शेड न वापरता पांढऱ्या रंगाचा सनशाइन कागद वापरला, जेणेकरून रंगीत चित्रं नीट

उमटली जावीत. प्रकाशनाआधी प्रत्येक पुस्तकाच्या सर्व अंगांचा बारकाईनं आम्ही विचार करतो. त्याच्या प्रकृतीनुसार ते कसं दिसेल या दृष्टीत आम्ही पाहिलेल्या, वाचलेल्या आणि जगभरातल्या पुस्तकांच्या शरीररचनेचा आमचा (नकळत) झालेला अभ्यासच कामी येतो.

करोनाच्या काळातच 'पासोडी' हे पहिलं पुस्तक प्रकाशित झालं. 'पपायरस द बुक स्टोअर'ने विक्री आणि वितरणाची जबाबदारी उचलली. करोनानंतर समाजभव्यमांवरून पुस्तक विक्री करणारे वाढले आहेत हे खरं असलं तरी पारंपरिक पुस्तकवितरण आजही कमीजास्त प्रमाणात टिकून आहे. कोणत्याही एका माध्यमावर विसंबून न राहता दोन्हीची सांगड घालत, काळानुरूप उपलब्ध होत जाणारे पर्याय तपासत राहणं हे गरजेचं आहे. विक्री आणि वितरणाची वेगवेगळी समीकरणं मांडून नवीन पर्याय तयार करत राहणं ही सतत चालणारी शोध प्रक्रिया आहे.

पुस्तक प्रकाशित करताना, कुठेतरी विषयातील वैविध्यता जपताना मागणी तसा पुरवठा टाळून वेगळ्या जातकुळीच्या कथा, कादंबऱ्या, काळानुसार गरजेचं आणि नाविन्य असणारं साहित्य, जागतिक स्तरावरील साहित्य, नोबेल पुरस्कारप्राप्त पुस्तकांचे अनुवाद, नवे लेखक, आउट ऑफ प्रिंट असलेली पुस्तके अशी एकूण २६ पुस्तकं प्रकाशित केली आहेत. आजच्या काळात महत्त्वाचं ठरेल असं रोमिला थापर यांचं अनुवादित 'असहमतीचे आवाज', जर्वत पवार यांचं 'सत्य, सत्ता आणि साहित्य', ओरहान पामुकचं 'द नाईट्स ॲण्ड सेंटीमेन्टल नॉवेलिस्ट'. उदय प्रकाश यांच्या 'वॉरेन हेस्टिंग्जचा सांड' या दीर्घकथेचं सचित्र पुस्तक, स. गं. मालशे यांचं 'आगळे वेगळे' हे पुनर्मुद्रित पुस्तक. तसेच 'लीळा पुस्तकांच्या'ची सचित्र डीलक्स आवृत्ती, 'गांगल लावलेला घोडा', 'इत्तर गोष्टी', 'माणूस असण्याच्या आठवणी' हे कथासंग्रह, 'नवल', 'मोनोक्रोम', 'सातमायकथा' या कादंबऱ्या, यावर्षी इतालो काल्विनो यांचं 'इनव्हिजिबल सिटीज' मराठी भाषेतलं पहिलं पुस्तक येईल. शिवाय किरण क्षीरसागर याचा कथासंग्रह, दिनानाथ मनोहरांच्या दोन कादंबऱ्या, प्रियोळकरांची दोन पुस्तकं, नामदेव ढसाळ यांची कादंबरी, ही पुनर्मुद्रित पुस्तकं, प्रसाद कुमठेकर याची नवीन कादंबरी - ही यावर्षी प्रकाशित होणारी काही पुस्तकं.

वाचकांना गृहीत न धरता आपण नवनवीन उत्तम साहित्य परमोच्च मांडणीसह पोहोचवत राहिलो, तर वाचक त्याला हळूहळू आपलंसं करून घेतात हा अनुभव दर पुस्तकागणिक येऊ लागला. मग आपण योग्य वाटेवर चालतोय हे लक्षात येतं. ही अशी वेगवेगळी पुस्तकं प्रकाशित करताना 'ग्यार्थ इन्स्टिट्यूट'ची आणि काही जेष्ठ मित्रांच्या, लेखकांच्या मार्गदर्शनाने खूप मदत झाली.

स्वतः प्रकाशनाच्या बाबतीत ठरवलेल्या मापदंडानुसार उत्तम पुस्तक निर्मिती करण्याच्या रोमँटिसिझमला तितकीच रोखठोक आर्थिक बाजूदेखील आहे. सद्यःस्थितीत वाढत्या महागाईच्या काळात आपल्याला आवडलेल्या साहित्याला, हवं तसं प्रकाशित करताना आर्थिक नियोजन असं करावं लागतं, जेणेकरून पुस्तकाशी संबंधित असलेल्या व्यक्तींना योग्य मोबदला देता यावा, तसेच पुस्तकाची किंमत वाचकांच्या खिशालाही परवडणारी असावी. कागदाची वाढत जाणारी किंमत आणि मुद्रणावर वाढत जाणारा जीएसटीचा परिणाम आर्थिक गणितावर होतो. पुस्तकांची विक्री आणि त्याला लागणारा वेळ याला कुठलाही असा एक मापदंड नाही, त्यामुळे संयम, चिकाटी आणि आर्थिक पाठबळ कायम ठेवावं लागतं. पूर्वीच्या प्रकाशन सांभाळून तुमचा चरितार्थ चालवणं आणि मनासारखी उत्तम निर्मिती करत राहणं हे प्रत्येकाला लगेच शक्य होईल असं नाही, त्यासाठी काही काळ जाऊ द्यावा लागतो. असे प्रकाशक तयार झाले तर मराठी भाषेतील साहित्याच्या नव्या शक्यता तयार होतील आणि नवनवीन प्रयोग देखील.

आतापर्यंत पपायरस प्रकाशनाला सहा वर्षं झालीत. या काळात वाचकांचं खूप चांगला प्रतिसाद मिळाला. या सगळ्यातून उत्तम निर्मिती करायला बळ मिळतंय, प्रत्येक निर्मिती नवं शिकायला मिळतंय. आपण व्यवसायाचं संतुलन पाहतोच, पण त्याही पलीकडे मराठीसाठी उत्तम ते काय करता येईल असा विचार सतत सोबत असतो आणि तो पुढची वाट दाखवायला आणि नवं काही करू पाहायला बळ देतो.

◆ papyrusprakashan@gmail.com